<u>सन २०१७-२०१८ अर्थसंकल्पीय अनुदान मागणी क्र. जे-५, ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्ज - (२०१)(००)(०१) घरबांधणी अग्रिम.</u>

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः घबाअ - १२१८/(२)/प्र.क्र.०४ /पाच,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २७ फेब्रुवारी २०१८

संदर्भ :

१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः - एचबीए१०८०/सीआर ४९२/जीईएन ५,दि. १.१.१९८१
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः - अग्रिम १०९६/प्र.क्र.२६/९६/विनयिम, दि. १५.१०.१९९६
३) शासन परिपत्रक क्रमांकः - घबांअ१००१/९५(२)/का.पाच, दि. २३.०२.२००१
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक -घबांअ २०१२/प्र. क्र. ३०/२०१२/विनियम, दि. २०.०२.२०१५
५) शासन शुद्धीपत्रक वित्त विभाग क्रमांक-घबांअ २०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम,दि.२९.०२.२०१६
६) शासन ज्ञापन विधि व न्याय विभाग क्र. अनुदा-२२१७/(प्र.क्र.५६/१७)/का.२३, दि.२१ .०४.२०१७
७) शासन ज्ञापन विधि व न्याय विभाग क्र. अनुदा-२२१७/(प्र.क्र.५६/१७)/का.२३, दि.१२ .०२.२०१८

शासन निर्णय :-

मागणी क्र. जे-५, ७६१०- शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्ज (२०१)(००)(०१)- घरबांधणी अग्रिम, (७६१० ०४७२) (योजनेतर/दत्तमत) या लेखाशीर्षाखालील सन २०१७-१८ या वर्षाकरिता मंजूर लेखानुदानातून, यादी क्रमांकः “१,२,३व ४” मध्ये दर्शविलेल्या कर्मचा-यांना घरबांधणी अग्रिम या प्रयोजनासाठी सोबतच्या विवरणपत्र “अ” मधील रकाना क्र. ३ येथील नियंत्रक अधिकारी यांना रकाना ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण रु.४,१७,९०,९३५/- (रुपये चार कोटी सतरा लाख नव्वद हजार नऊशे पस्तीस फक्त) इतका निधी खालील अटींच्या अधीन राहून प्रमाणित करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अटी आणि शर्ती :-

१. हा निधी, वित्त विभाग शासन निर्णय क्र. घबांअ१०९९/प्र.क्र.२/९९/विनियम, दि. ८.७.१९९९ व शासन निर्णय वित्त विभाग क्र. घबांअ१०८८/(१५५)/विनियम, दि. ६.११.१९९०, शासन निर्णय वित्त विभाग क्र.घबांअ१०११/प्र.क्र.५६/२०११ / विनियम, दि.२७.२.२०१२ व शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक घबांअ २०.१२/प्र. क्र. ३०/२०१२/विनियम, दि. २०.२.२०१५ तसेच मुंबई वित्तीय नियम, १९५९, नियम १३४, परिशिष्ट २६ मधील विहित नियम/अटींचे काटेकोरपणे पालन करुन व त्याच्या अधीन राहून निधी वितरीत करण्याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. त्याचप्रमाणे प्रमाणित अग्रिमाच्या रकमेचे वितरण आदेश पारित करतांना संबंधित नियंत्रक अधिकाऱ्याने वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णय व नियमावलीतील तरतुदींच्या अनुषंगाने प्रस्तावाची परिपूर्ण छाननी करुन मगच रक्कम आहरीत करावी, व त्यानुषंगाने याबाबत कोणतेही न्यायीक प्रकरण उद्भवल्यास त्यास नियंत्रक अधिकारी जबाबदार राहतील.

२. प्रमाणित अग्रिम संबंधित अर्जदारास वितरीत करण्यापूर्वी व प्रकरणपरत्वे अर्जदाराने सर्व बाबींची/कागदपत्रांची पूर्तता केलेली आहे व ते स्थायी असल्याची पूर्ण खात्री करुन घेतल्यावरच अग्रिमास मंजुरी देण्यात यावी. तसेच अर्जदार सेवानिवृत्त होण्यापुर्वी त्याच्याकडून मंजूर करण्यात आलेल्या संपूर्ण अग्रिमाची व्याजासह वसुली होईल हे संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी पहावे.

३. अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वित्तीय वर्षाचे अनुदान उपलब्ध असेपर्यंत या अग्रिमास मंजुरी देऊन अग्रिमाची रक्कम कोषागारातून काढण्यात यावी. तसेच कोषागारातून रक्कम काढल्यानंतर ती रक्कम तीन दिवसाच्या आत संबंधित अर्जदाराला देण्यात यावी.

४. घरबांधणी (Under construction) प्रयोजनार्थ अग्रिम घेतले आहे अशा प्रकरणी अर्जदाराच्या घराचे बांधकाम विहित टप्प्यापर्यन्त पूर्ण केले आहे, याची खातरजमा नियंत्रक अधिकाऱी यांनी करावी व तद्नंतरच दुसऱ्या व तिसऱ्या टप्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करावा. ज्या अर्जदाराना ३ रा हप्ता/अंतिम हप्ता प्रमाणित करण्यात आला आहे, त्या अर्जदारांकडून नियमानुसार आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांची पूर्तता करुन घेऊन नंतरच प्रत्यक्ष रक्कम प्रदान करावी.

५. "जमीन खरेदी करुन घर बांधणे" या प्रयोजनासाठी अग्रिमाचा पहिला हप्ता मंजूर केल्यानंतर दुसरा हप्ता मंजूर करण्याची शिफारस करण्यापूर्वी अर्जदाराच्या घराचे मंजूर आराखडे, स्थानिक प्राधिकरणाच्या मंजुरी आदेशाची प्रत व मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र बी-१ मध्ये अर्जदाराने भरुन दिलेल्या नोंदणीकृत गहाण खताची प्रत नियंत्रक अधिका-यांनी त्यांच्या अभिलेखात जतन करुन ठेवावी. घरबांधणी या प्रयोजनासाठी या ज्ञापनानुसार प्रमाणित करण्यात आलेल्या अग्रिम धनास प्रत्यक्ष मंजुरी देण्यापूर्वी अर्जदाराने मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र बी-२ मध्ये भरुन दिलेल्या गहाण खताची प्रत नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांच्या अभिलेखात जतन करुन ठेवावी. ज्या अर्जदारांना हप्त्याने अग्रिम प्रमाणित करण्यात आले आहे, अशा अर्जदारांकडून त्यांना मिळालेल्या अग्रिमाची वसुली, त्यावरील व्याजाची वसुली मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील तरतूदीनुसार प्रकरणपरत्वे करण्यात यावी.

६. " तयार घर खरेदी" या प्रयोजनासाठी अग्रिम प्रमाणित करण्यात आलेल्या अर्जदारांकडून मुंबई वित्तीय नियम, १९५९ अंतर्गत परिशिष्ट २६ मधील प्रपत्र ए-२ मध्ये करारनाम्याची प्रत भरुन घेण्यात आल्यावरच अग्रिमाची रक्कम प्रत्यक्षात अदा करण्यात यावी. तयार घर खरेदी (जुने अथवा नवे) या प्रयोजनासाठी अर्जदारास शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक घबांअ १०८७/(४६५)/विनियम, दिनांक ६.११.१९९० मधील विशिष्ट अटींच्या अधीन राहून व त्यामध्ये नमूद केलेली कागदपत्रे सादर केलेली आहेत, याची खात्री झाल्यावरच अग्रिम मंजूर करण्यात यावा. तसेच नियंत्रक अधिकारी यांनी जुने तयार घर/नवीन तयार घर याबाबत अधिकारी/कर्मचारी यांचेकडून खरेदीचे करारपत्र स्विकारताना ते योग्य ते मुद्रांक शुल्क (Stamp Duty) भरुन दुय्यम निबंधक, महसूल व वन विभाग यांच्याकडे संबंधितांकडून नोंदणी (Registration) केले असल्याबाबतची शहानिशा करावी.

७. "घरखरेदीसाठी/घरबांधणीसाठी वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड" या प्रयोजनासाठी अग्रिम प्रमाणित करण्यात आले आहे, अशा अर्जदारांकडून अग्रिम मंजुरी पूर्वी त्यांच्या कर्ज व शिलकीबाबतचे संबंधित वित्तीय संस्थेने दिलेले अलीकडील प्रमाणपत्र घेऊन त्याप्रमाणे प्रत्यक्ष शिल्लक कर्जाइतकेच अग्रिम मंजूर करावे.

८. जर काही कारणास्तव अग्रिम मंजूर करण्यात येत नसेल तर तसे शासनास त्वरीत कळविण्यात यावे. तसेच प्रमाणित अग्रिमापेक्षा कमी रक्कम मंजूर करण्यात येत असेल तर तसेही समुचित तपशीलासह तात्काळ कळविण्यात यावे व प्रमाणित अग्रिमाची उर्वरित रक्कम या विभागास अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे (BDS) तात्काळ परत करण्यात यावी.

९. घरबांधणी अग्रिम मंजुरी आदेश काढतांना सदर सदनिकेचा वा घराचा विमा शासकीय विमा निधीकडेच उतरवावा अशी अट आदेशात नमूद करावी व त्याचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी. तसेच सदर मंजुरी आदेशाची प्रत विमा संचालक, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, म्हाडा, २६४, पहिला मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई-४०० ०५१ यांनाही माहितीसाठी अग्रेषित करावी.

१०. प्रत्येक नियंत्रक अधिकारी यांनी उद्दीष्ट निहाय केलेला दर महिन्याचा प्रत्यक्ष खर्च हा महालेखापाल यांच्या लेख्यामध्ये दर्शविण्यात आलेल्या खर्चाशी तंतोतंत जुळण्यासाठी http://agmaha.cag.gov.in या वेबसाईटवर दरमहा मासिक खर्चमेळाचे काम ऑनलाईन करण्यात यावे व पडताळणी केलेल्या खर्चाचे मासिक विवरणपत्र रिकंसिलीएशन कंप्लिशन स्लिपसह प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत या विभागाच्या कार्यासन ५/२४ कडे परस्पर पाठविण्यात यावे.

११. अर्जदारास ज्या प्रयोजनासाठी अग्रिम मंजूर करण्यात आले आहे, त्याने त्याच प्रयोजनासाठी त्या रकमेचा विनियोग करण्यात आला असल्याच्या विनियोग प्रमाणपत्राची मूळ प्रत मंजुरी अधिका-यांनी त्यांच्या अभिलेखात ठेवून दुय्यम प्रत शासनास पाठवावी. तसेच प्रमाणित केलेल्या रकमेचा विनियोग विहित कालावधीत न झाल्यास प्रमाणित रक्कम त्वरीत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

१२. यादी क्रमांक २ व ४ मधील अर्जदार मागासवर्गीय असल्याची सेवापुस्तक किंवा जातीच्या दाखल्याच्या आधारे खात्री करुन घेतल्यानंतरच घरबांधणी मंजुरीचे आदेश काढावेत. सदर बाब १५ दिवसात पूर्ण न झाल्यास प्रमाणित रक्कम शासनास परत करण्यात यावी. जेणेकरुन सदर रक्कम इतर पात्र अर्जदारास प्रमाणित करणे शक्य होईल. जर काही कारणास्तव अग्रिम मंजूर करण्यात येत नसेल तर तसे शासनास त्वरीत कळविण्यांत यावे. तसे न झाल्यास यासंदर्भात उद्भवणा-या अनियमिततेस संबंधित नियंत्रक अधिकारी जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

१३. संबंधित अधिकारी आपल्या कार्यालयातून बदलून दुसरीकडे गेला असल्यास, अर्थसंकल्पिय वित्तीय प्रणालीवर Authorisation Slip काढण्यापूर्वी, त्याबाबतचा तपशील शासनास कळविण्यात यावा. तद्नंतर त्या अनुषंगाने, प्रणालीवर प्राधिकृत करण्यात आलेल्या रकमेमध्ये शासनाकडून आवश्यक ते बदल करण्यात आल्यानंतरच देयक तयार करण्याबाबतची पुढील कार्यवाही संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी करावी.

१४. घरबांधणी अग्रिमाच्या मुद्दलाची परतफेड 'घरबांधणी अग्रिम -७६१०-शासकीय कर्मचारी इत्यादिना कर्जे-२०१, (००)(०१) घर बांधणीसाठी आगाऊ रकमा (७६१०५०१५) या जमा शीर्षाखाली आणि व्याज '००४९-व्याज जमा-८००-इतर जमा (०१) (४४) (i) घरबांधणीसाठी आगाऊ रकमा (००४९१७३८) शासकीय कर्मचा-यांना दिलेल्या कर्जावरील व्याज ४४ (१) घरबांधणी अग्रिम ' या जमा शीर्षाखाली जमा करण्यात यावे.

१५. या शासन निर्णयान्वये प्रमाणित करण्यात आलेल्या अग्रिमावर वित्त विभागाने वेळोवेळी निश्चित केलेल्या/करण्यात आलेल्या दरानुसार व्याजाची आकारणी करण्यात यावी. सोबतच्या यादीतील अर्जदारानी प्रमाणित केलेले घरबांधणी अग्रिम हे संबंधित अर्जदाराच्या कार्यालय प्रमुख /नियंत्रक अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीवरुन प्रमाणित करण्यात येत आहे. त्यामुळे वित्त विभागाने निश्चित केलेल्या नियमांच्या अधीन राहून अग्रिमाचे वितरण करणे व ती वसूल करणे याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित कार्यालय प्रमुख / नियंत्रक अधिकारी यांची राहील.

१६. ज्या अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेल्या घरबांधणी अग्रिमाबाबत त्यांच्या सेवापुस्तकात त्याप्रमाणे नोंद घेण्यात यावी. नोंद घेतलेल्या सेवापुस्तकाची पृष्ठाची छांयाकिंत प्रत शासनास सादर करावी.

१७. सर्व नियंत्रक अधिकाऱ्यांनी उपलेखाशीर्षनिहाय व उद्दिष्टनिहाय मासिक खर्चाचे नियोजन करुन अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीद्वारे (BDS) तरतुदीचे वाटप आहरण व संवितरण अधिका-यांना करावे. सदर अनुदानातून केला जाणारा खर्च मासिक निधी विवरणपत्रानुसार संगणकीय अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे (BDS) दरमहा त्या त्या महिन्याचा खर्च त्याच महिन्यांमध्ये करण्यात यावा व तो मंजूर तरतुदींच्या मर्यादेत करण्यात यावा.

१८. या बाबीवर होणारा खर्च मागणी क्रमांक जे-५, ७६१०-शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे (योजनेतर/दत्तमत) (२०१)(००)(०१)-घरबांधणीसाठी अग्रिम (७६१० ०४७२) या खाली खर्ची टाकण्यात यावा व २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरिता मंजूर झालेल्या अर्थसंकल्पीय अनुदानातून भागविण्यात यावा.

१९. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अंदाज २०.१३/प्र.क्र.८५/२०१३ अर्थसंकल्प-३, दि. २५ एप्रिल २०१३ मधील अट क्र. ८ च्या अधिन सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

२० सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२७१७१०४१२७१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:05:09 +05'30'

(आ.न.वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र :- विवरणपत्र -'अ' व 'यादी क्र. १,२,३ व ४'

प्रत,

१. मा. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई.
२. सह सचिव (प्रशा), विधि व न्याय विभा, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई
४. प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई/औरंगाबाद
५. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई (२ प्रती).
६. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई (२ प्रती).
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर (२ प्रती).
८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर (२ प्रती).
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
११. प्रबंधक प्रशा ,उच्च न्यायालय, मुंबई ,खंडपीठ नागपूर
१२. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा/यवतमाळ/औरंगाबाद/परभणी/बीड/नांदेड /उस्मानाबाद/लातूर/धुळे/जळगाव/अहमदनगर/सांगली/सोलापूर/रायगड-अलिबाग/ रत्नागिरी/चंद्रपूर/ गडचिरोली/नंदुरबार
१३. जिल्हा कोषागार अधिकारी, बुलडाणा/ यवतमाळ/ औरंगाबाद/ परभणी/ बीड/ नांदेड/ उस्मानाबाद/लातूर/धुळे/जळगाव/अहमदनगर/सांगली/सोलापूर/रायगड-अलिबाग/ रत्नागिरी/ चंद्रपूर/ गडचिरोली/नंदुरबार
१४. कार्यासन अधिकारी, वित्त विभाग/अर्थसंकल्प ७ व १० मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५. कार्यासन अधिकारी (कार्या-२ अ, कार्या -२३ व कार्या-२४), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१६. निवड नस्ती (कार्यासन- पाच), विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

विवरणपत्र "अ"

शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. घबांअ १२१८/(२)/प्र.क्र. ०४/का. पाच, दि.२७ फेब्रुवारी २०१८ सोबतचे विवरणपत्र (आकडे रुपयात)

अ. क्र.	CO Code	मंजूरी /नियंत्रक अधिकारी	प्रमाणित करण्यात आलेले घरबांधणी अग्रीम (रुपये)
१	२	३	४
१	J००६०	सह सचिव, (प्रशा) विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई	२००००००
२	J००३८	मुख्य न्यायाधीश,लघुवाद न्यायालय,मुंबई	१२०५८४६
३	J०००४	प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई	१३२६६६७
४	J०००९	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	३१९४५२०
५	J००११	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ	१४०८७१३
६	J००१२	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद	९१०९६९
७	J००१४	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी	१३१४६००
८	J००१५	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड	३३५००००
९	J००१६	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड	१६७५३३२
१०	J००१७	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद	८१००००
११	J००१८	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर	४२००००
१२	J००२०	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे	६८२५००
१३	J००२१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव	१२५४०००
१४	J००२२	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	२६२५८४०
१५	J००२५	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सांगली	८३१६४०
१६	J००२७	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर	५८९७७०
१७	J००३०	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रायगड-अलिबाग	३०००००
१८	J००३१	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी	३९६००००
१९	J००३५	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर	५४००००
२०	J००३६	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	१६९३२००
२१	J०००७	प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, औरंगाबाद	१४७८४००
२२	J००८३	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	७५५७७२८
२३	४६०१००४४४९	प्रबंधक प्रशा, उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर	२६६१२१०
		एकुण रु. चार कोटी सतरा लाख नव्वद हजार नऊशे पस्तीस फक्त	४१७९०९३५

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:05:28 +05'30'

(आ.न.वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

यादी क्र.१ अमागास (वर्ग-१,२,३ चे अधिकारी/कर्मचारी)								
शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. घबांअ १२१८/(२)/प्र.क्र. ०४/का. पाच, दि. २७ फेब्रुवारी २०१८ सोबतचे विवरणपत्र (आकडे रुपयात)								
अ.क्र.	अर्जदाराचे नाव	पदनाम	मंजूरी अधिकारी	प्रयोजन	अनुज्ञेय अग्रिम	मंजूर करावयाचे अग्रीम	हप्ता/एक रकमी	शेरा
१	श्री. प्रविण सुरेशअप्पा आवटे	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	घरबांधणी	१४६३६००	१०२४५२०	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
२	श्री. महेश गोपाळराव सोनवणे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव	घरबांधणी	११७००००	८१९०००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
३	दिवाकर व्यकंटराव जोशी	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी	घरबांधणी	१४७८४००	१०३४८८०	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
४	श्री. सुनिल रविंद्र पाटील	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगाव	घरबांधणी	१४५००००	४३५०००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
५	श्री. रमेश रामराव जोशी	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड	घरबांधणी	१५०००००	४५००००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
६	श्री. बाळासाहेब गोरक्षनाथ मुरदारे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	घरबांधणी	१०७१७००	७५०१९०	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
७	श्री. आकाश दत्तात्रय थोरात	सह दिवाणी न्यायाधिश	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी	गृहकर्ज परतफेड	२३०२८८५	२२३८०००	एकरकमी	नियमानुसार
८	श्री. गणेश शंकरराव सुरवसे	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद	जमीन खरेदी	६०००००	६०००००	एकरकमी	नियमानुसार
९	श्री. प्रकाश गुलाबराव शिंदे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद	गृहकर्ज परतफेड	१६०४१६०	९१०९६९	एकरकमी	नियमानुसार
१०	श्री. अजय जयंतराव कोडगिरे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, लातूर	घरबांधणी	१४०००००	४२००००	३० % पहिला हप्ता	नियमानुसार
११	श्री. सुरेश टिला शिरसाठ	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	१०८५०००	७५९५००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१२	श्री. मनोजकुमार गोविंदभाई गागरे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	१५०००००	४५००००	३० % पहिला हप्ता	नियमानुसार
१३	श्री. सागर नारायणराव पाटील	उप प्रबंधक	प्रबंधक प्रशा, उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर	गृहकर्ज परतफेड	२७७४८२२	२६६१२१०	एकरकमी	नियमानुसार
१४	श्री. मोहम्मद अमीन बशीरोदीन	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नांदेड	तयार घर खरेदी	१४८८०००	१२२५३३२	एकरकमी	नियमानुसार
१५	श्रीमती उर्मिला किशोर मराठे	लिपिक	प्रमुख न्यायधीश, कौटुंबिक न्यायालय,मुंबई	गृहकर्ज परतफेड	१४२२५२१	१३२६६६७	एकरकमी	नियमानुसार
१६	संतोष आ मुटकुळे	लघु लेखक (निम्न श्रेणी)	सह सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई	गृहकर्ज परतफेड	२००००००	२००००००	एकरकमी	नियमानुसार
एकूण- (एक कोटी एकाहत्तर लाख पाच हजार दोनश अडूसष्ठ फक्त)						१७१०५२६८		

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:05:43 +05'30'

(आ.न.वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

यादी क्र.२ मागास (वर्ग-१,२,३ चे अधिकारी/कर्मचारी)

शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. घबांअ १२१८/(२)/प्र.क्र. ०४/का. पाच, दि. २७ फेब्रुवारी २०१८ सोबतचे विवरणपत्र (आकडे रुपयात)

अ.क्र.	अर्जदाराचे नाव	पदनाम	मंजूरी अधिकारी	प्रयोजन	अनुज्ञेय अग्रिम	मंजूर करावयाचे अग्रीम	हप्ता/एक रकमी	शेरा
१	श्री. जालींदर तुळशीराम माने	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	घरबांधणी	१००००००	४०००००	२रा हप्ता४०%	नियमानुसार
२	श्री विजय पुंजाजी डहाळे	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	घरबांधणी	२००००००	६०००००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
३	श्री. श्रीकांत मारोती वासेकर	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	घरबांधणी	१८४४०००	५५३२००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
४	श्री. रवि नामदेवराव माणुसमारे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली	घरबांधणी	१८०००००	५४००००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
५	श्री. विश्वास पुंजाजी वाघमारे	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	घरबांधणी	१३२००००	३९६०००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
६	श्री सुर्यकांत बळीराम माकोने	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	घरबांधणी	१००००००	७०००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
७	श्री. विजय शिवाजी वखरे	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	घरबांधणी	१३०००००	९१००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
८	श्रीमती सुजाता रविंद्र डोंगरदिवे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बुलडाणा	घरबांधणी	८०००००	५६००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
९	श्री. विश्वनाथ नाना गायकवाड	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	१७०००००	११९००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१०	श्री. किशोर गुलाब ठाकूर	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	१२०००००	८४००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
११	श्री. विलास यशंवत सुर्यवंशी	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	८०००००	५६००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१२	श्री. रणजीत शांताराम चौधरी	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, धुळे	घरबांधणी	९७५०००	६८२५००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१३	श्री. महादेव भाऊराव गाडे	कनिष्ठ लिपिक	जिल्हा व सत्र न्यायाधीश,अहमदनगर	घरबांधणी	१२५००००	३७५०००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
१४	श्री. अंबादास जालिंदर सोनवणे	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर	जमीन खरेदी करुन घरबांधणी	१६०००००	५८९७७०	दुसरा हप्ता	नियमानुसार
१५	श्री. जीवन विठ्ठल पवार	बेलिफ	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी	घरबांधणी	१२३००००	८६१०००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१६	श्री. सुदाम एकनाथ भालेराव	बेलिफ	जिल्हा व सत्र न्यायालय,परभणी	घरबांधणी	३९९६००	२७९७२०	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१७	श्री. महेश नामदेव आंबटकर	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर	घरबांधणी	१८०००००	५४००००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार
१८	श्री. अनिल राजेंद्र चव्हाण	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर	घरबांधणी	१००००००	७०४६५०	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
१९	श्री. पद्माकर नानाजी खसाळे	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ	घरबांधणी	१००००००	३०००००	३० % तिसरा हप्ता	नियमानुसार

२०	श्रीमती जया चेतनराव बुराडे	कनिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ	गृहकर्ज परतफेड	६१००००	५९८६८४	एकरकमी	नियमानुसार
२१	श्री. गिरीश्वर रामलिंग कुंभार	वरिष्ठ लिपिक	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सांगली	गृहकर्ज परतफेड	८८४०००	८३१६४०	एकरकमी	नियमानुसार
२२	श्री. दिपक निवृत्ती मुंढे	लिपिक टंकलेखक	मुख्य न्यायधीश,लघुवाद न्यायाधीश, मुंबई	गृहकर्ज परतफेड	१२३५०००	१२०५८४६	एकरकमी	नियमानुसार
२३	श्री. अभय सोपानराव वाघवसे	न्यायाधीश	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	गृहकर्ज परतफेड	५००००००	२९१८२२८	एकरकमी	नियमानुसार
एकूण- (एक कोटी एकाहत्तर लाख छत्तीय हजार दोनश अडतीस फक्त)						१७१३६२३८		

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:06:02 +05'30'

(आ.न.वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

यादी क्र.३ अमागास (वर्ग-४ चे कर्मचारी)								
शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. घबांअ १२१८/(२)/प्र.क्र. ०४/का. पाच, दि.२७ फेब्रुवारी २०१८ सोबतचे विवरणपत्र (आकडे रुपयात)								
अ.क्र.	अर्जदाराचे नाव	पदनाम	मंजूरी अधिकारी	प्रयोजन	अनुज्ञेय अग्रिम	मंजूर करावयाचे अग्रीम	हप्ता/एक रकमी	शेरा
१	श्री. दिपक अमृतलाल चौधरी	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नंदुरबार	घरबांधणी	१२०००००	८४००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
२	श्री. नागेश पांडुरंग कुलकर्णी	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड	घरबांधणी	१००००००	७०००००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
३	श्री. सुनिल रमाकांतराव मोरे	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड	तयार घर खरेदी	११५००००	११५००००	एकरकमी	नियमानुसार
४	श्री. परमेश्वर नवनाथ खुपसे	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड	तयार घर खरेदी	१५०००००	१५०००००	एकरकमी	नियमानुसार
५	श्रीमती प्रभावती चंद्रकांत मुंढे	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद	घरबांधणी	७०००००	२१००००	३० % पहिला हप्ता	नियमानुसार
					(एकूण चव्वेचाळीस लाख फक्त)	४४०००००		

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:06:36 +05'30'

(आ.न.वसावे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

यादी क्र.४ मागास (वर्ग-४ चे कर्मचारी)								
शासन निर्णय, विधि व न्याय विभाग, क्र. घबांअ १२१८/(२)/प्र.क्र. ०४/का. पाच, दि. २७ फेब्रुवारी २०१८ सोबतचे विवरणपत्र (आकडे रुपयात)								
अ.क्र.	अर्जदाराचे नाव	पदनाम	मंजूरी अधिकारी	प्रयोजन	अनुज्ञेय अग्रिम	मंजूर करावयाचे अग्रीम	हप्ता/एक रकमी	शेरा
१	श्री. रमेश चंपतराव कोडापे	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, यवतमाळ	गृहकर्ज परतफेड	५१३१४४	५१००२९	एकरकमी	नियमानुसार
२	श्री. सचिन विठ्ठल पवार	शिपाई	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रत्नागिरी	घरबांधणी	१२३००००	८६१०००	२ रा व ३ रा हप्ता ७०%,	नियमानुसार
३	श्री. संदिप सुधाकर पाटील	शिपाई नि पहारेकरी	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, रायगड ६ अलिगाब	घरबांधणी	१००००००	३०००००	३० % पहिला हप्ता	नियमानुसार
४	श्री. सज्जन दशरथ गादेकर	शिपाई	प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, औरंगाबाद	गृहकर्ज परतफेड	१४७८४००	१४७८४००	एकरकमी	नियमानुसार
एकूण (एकतीस लाख एकोणपन्नास हजार चारशे एकोणतीस)						३१४९४२९		

Akusing Narshi Vasave

Digitally signed by Akusing Narshi Vasave
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5ab84183e07eb916b3161523e73f56110b7dfcea4b15e66c8dac75aa76eaad47, cn=Akusing Narshi Vasave
Date: 2018.02.28 16:06:53 +05'30'

(आ.न.वसावे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन